वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, मोझरी; जिल्हा अमरावती मुलभूत सुविधा निर्माण करण्याचा विकास आराखडा. -
आराखड्यातील कामांना मुदतवाढ देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
नियोजन विभाग
शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१६/प्र.क्र.२२/का.१४४४

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय, मुंबई-३२
तारीख: ३० जानेवारी, २०१८

वाचा :

१) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र.तीक्षेवी-२०१५/१३/प्र.क्र.०३/का.१४४४ दि. २१ फेब्रुवारी,२०१५
२) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र. तीक्षेवि-२०१६/प्र.क्र.२२/का.१४४४ दि.१० मे,२०१६
३) नियोजन विभाग, शासन निर्णय, क्र.तीक्षेवि-२०१६/प्र.क्र.२२/का.१४४४ दि.१६ जानेवारी,२०१७

प्रस्तावना :

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, यांच्या जन्मतिथीस १०० वर्ष पूर्ण झाल्या प्रित्यर्थ, श्रीक्षेत्र मोझरी; जिल्हा अमरावती येथे मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी संदर्भाधिन क्र. १ च्या शासन निर्णयानुसार रु. १५०.८३ कोटीच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्रीक्षेत्र मोझरी; जिल्हा अमरावती येथे मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी सदर सुधारित आराखड्यातील कामे पूर्ण करण्यासाठी संदर्भाधिन अनुक्रमांक्र. २ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१ मार्च २०१७ पर्यंत व तद्नंतर संदर्भाधिन अनुक्रमांक ३ च्या शासन निर्णयान्वये दिनांक ३१ मार्च, २०१८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. सन २०१७-१८ मध्ये कार्यारंभ आदेश देण्यात आलेली कामे व कार्यारंभ आदेश देण्याची प्रक्रिया विभागीय आयुक्त, अमरावती यांचे स्तरावर सुरू आहे, या पार्श्वभूमीवर सुधारित आराखड्यानुसार अशी कामे पूर्ण करण्याकरिता १ वर्ष कालावधीकरिता मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, मोझरी; जिल्हा अमरावती येथे मुलभूत सुविधा निर्माण करण्यासाठी संदर्भाधीन अनुक्रमांक १ च्या दि. २१ फेब्रुवारी, २०१५ च्या शासन निर्णयानुसार मंजूर करण्यात आलेल्या सुधारीत विकास आराखडयातील कामे पूर्ण करण्यासाठी, दिनांक ३१ मार्च, २०१९ पर्यंत मुदतवाढ देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०१३०१५०४४५५६१६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशांनुसार व नांवाने,

Digitally signed by Vidya Hampayya
Date: 2018.01.30 15:11:19 +05'30'

(विद्या हम्पय्या)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विरोधी पक्षनेता/विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई,
२. सर्व सन्माननीय विधानसभा, विधान परिषद व संसद सदस्य,
३. मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
४. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
५. मा. मंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६. मा. राज्यमंत्री उद्योग व खणीकर्म, व पर्यावरण तथा पालकमंत्री,(अमरावती) मंत्रालय, मुंबई
७. मा. राज्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
८. मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
९. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई,
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-२, नागपूर,
११. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती,
१२. जिल्हाधिकारी, अमरावती,
१३. वित्त विभाग (व्यय-८)/(अर्थ-१६) मंत्रालय, मुंबई,
१४. जिल्हा कोषागार अधिकारी, अमरावती,
१५. नियोजन विभाग, का.१४२४, मंत्रालय, मुंबई,
१६. निवड नस्ती, का. १४४४, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.